# Shri Lemdeo Patil Mahavidyalaya Mandhal, Dist, Nagpur

Department of Marathi

मराठी विभाग

बी. ए. भाग १ दुसरे सत्र B.A. I Sem II

घटक : मराठी पद्य

## कणा

कवी: कुसुमाग्रज

------------------------

डॉ. तीर्थराज कापगते

मराठी विभाग प्रमुख

# कविवर्य कुसुमाग्रज (विष्णू वामन शिरवाडकर)

## जन्म : २७ फेब्रुवारी १९१२ मृत्यू : १०

- कुसुमाग्रज म्हणजे विष्णु वामन शिरवाडकर तथा तात्यासाहेब शिरवाडकर हे वि.स. खांडेकर यांच्यानंतर मराठी साहित्यात ज्ञानपीठ पुरस्कार मिळवणारे ते दुसरे साहित्यिक होते. अग्रगण्य कवी, लेखक, नाटककार, कथाकार व समीक्षक होते. ते आत्मनिष्ठ व समाजनिष्ठ जाणीव असणारे मराठीतले महत्त्वाचे लेखक मानले जातात. शिरवाडकरांचे वर्णन सरस्वतीच्या मंदिरातील देदीप्यमान रत्न असे करतात. त्यांचा जन्म दिवस (२७ फेब्रुवारी) हा मराठी भाषा गौरव दिन अथवा मराठी राजभाषा दिवस म्हणून साजरा केला जातो.
- मराठी अभिरुचीवर चार दशकांपेक्षा अधिक काळ प्रभाव गाजविणारे श्रेष्ठ प्रतिभावंत कवी, नाटककार, कथाकार, कादंबरीकार, लघुनिबंधकार व आस्वादक समीक्षक. प्रामाणिक सामाजिक आस्था, क्रांतिकारक वृत्ती आणि शब्दकलेवरचे प्रभुत्त्व ही त्यांच्या काव्याची वैशिष्ट्ये आहेत. त्यांच्यातल्या सखोल सहानुभूतीने त्यांना समाजाच्या सर्व थरांतील वास्तवाला भिडण्यासाठी आणि पौराणिक आणि ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वांमधील मानवी वृत्तीचा शोध घेण्यासाठी प्रवृत्त केले. त्यांच्यातल्या शोधक आणि चिकित्सक स्वभावाने त्यांना प्रत्यक्ष ईश्वरासंबंधी प्रश्न उपस्थित करायला आणि माणसाच्या समग्रतेचे आकलन करायला प्रवृत्त केले.
- कुसुमाग्रजांचे व्यक्तिमत्त्व फार समृद्ध आणि प्रगल्भ होते. ते वैविध्यपूर्ण आणि प्रसन्न रूपात त्यांच्या साहित्यातून प्रतिबिंबित झाले आहे. कुसुमाग्रजांच्या मराठी कविता तरुणांना प्रेरणा देणाऱ्या आहेत.
- रसयात्रा या कविवर्य बा. भ. बोरकर आणि शंकर वैद्य यांच्नी संपादित केलेल्या काव्यसंग्रहात त्याची निवडक कविता समाविष्ट आहे.

# कणा

https://youtu.be/nnVKeDQDjVg

‘ओळखलत का सर मला ?’ - पावसात आला कोणी,
कपडे होते कर्दमलेले, केसांवरती पाणी.
क्षणभर बसला नंतर हसला बोलला वरती पाहून :
‘गंगामाई पाहुणी आली, गेली घरट्यात राहुन’.
माहेरवाशीण पोरीसारखी चार भिंतीत नाचली,
मोकळ्या हाती जाईल कशी, बायको मात्र वाचली.
भिंत खचली, चूल विझली, होते नव्हते नेले,
प्रसाद म्हणून पापण्यांवरती पाणी थोडे

माहेरवाशीण पोरीसारखी, चार भिंतींत नाचली
मोकळ्या हाती जाईल कशी, बायको मात्र वाचली
भिंत खचली, चूल विझली, होते नव्हते गेले
प्रसाद म्हणून पापण्यांमध्ये पाणी थोडे ठेवले
कारभारणीला घेऊन संगे, सर आता लढतो आहे
चिखलगाळ काढतो आहे, पडकी भिंत बांधतो आहे
खिशाकडे हात जाताच, हसत हसत उठला
पैसे नकोत सर, जरा एकटेपणा वाटला
मोडून पडला संसार, तरी मोडला नाही कणा
पाठीवरती हात ठेवून, फक्त

प्रेरणादायी संदेश देणारी कविता
आहे.

# कणा कवितेचे आशयसौंदर्य

▪ या कवितेवर मराठी माणसाने प्रेम केले आहे. साध्या शब्दांतली पण प्रभावी कविता. माणसाचा  कणा हे
स्वाभिमानाचे  प्रतीक म्हणून स्वाभिमाची  शिकवण देणाऱ्या या कवितेचे शीर्षक फार अन्वर्थक आहे.

▪ कठीण परिस्थितीत डगमगून न जाता स्वाभिमानांने जगणे महत्त्वाचे आहे असा संदेश ही कविता देतेच ; पण
त्याही पलीकडे विद्यार्थी – शिक्षकांमधील एका भावगर्भ नात्याचेही दर्शन घडते.

▪ शिक्षकांची भेट झाल्यावर ओोळखलं का सर मला ? या स्मरणप्रश्नातून या नात्याचा प्रवास सुरू होतो. शिक्षकाने
आधीच दिलेल्या शिकवणूकीचे स्मरण विद्यार्थ्याला होते.

▪ पुन्हा लढण्याची प्रेरणा घेऊन तो त्यांचा निरोप घेतो; आणि पुन्हा जीवनातील आव्हाने स्वीकारायला निघून जातो.

▪ तरुण झालेल्या विद्यार्थी नवा  संसार थाटतो; पण घरात गंगा नदीच्या पुराचे पाणी येते आणि  संसार उध्वस्त होतो.
क्षणात होत्याचे नव्हते होते. डोव्यांतही आसवांचा पूर येतो.

▪  अशा दुर्दैवी परिस्थितीत विद्यार्थ्याला आपल्यावर पुत्रवत प्रेम करणारे प्रसंगी

- तिशय अल्पाक्षरी असलेल्या कवितेत नुसते काव्य नाही, तर एक कथा आहे. तत्त सामाजिक पार्श्वभूमीवर संदेश आहे. प्रेरणा आहे. आदर्श आणि स्वाभिमानाने ज आता दुर्मीळ झाले आहेत. आणि विद्यार्थीही दुर्मीळ झाले आहेत. म्हणूनच जणू प्रश्न विचारतो, ओळखलं का सर मला ? शिक्षकांनाही तो खूप दिवसात भेटला न कुठे ? हेच जणू कवीला सांगायचे आहे.
- तरुण झालेल्या विद्यार्थी नवा संसार थाटतो; पण घरात गंगा नदीच्या पुराचे पाणी क्षणात होत्याचे नव्हते होते. डोळ्यांतही आसवांचा पूर येतो. अशा दुर्दैवी परिस्थित पुत्रवत प्रेम करणारे प्रसंगी धीर देऊन आत्मविश्वास वाढवणारे शिक्षक आठवता शिक्षकाची आठवण त्याला येते. हे दु:ख मोकळे करायला त्याला शिक्षक आठव फार महत्त्वाची घटना आहे.
- संसार उद्ध्वस्त करणाऱ्या नादिकडेही मुलीप्रमाणे बघणाऱ्या विद्यार्थ्याच्या एका व्यक्तिमत्त्वाची ओळख ही कविता वाचताना होते ; आणि असे व्यक्तिमत्त्व घडव आदर दुणावतो.
- सरांना भेटून गंगामाईच्या पाहुणपणाची सारी कथा सांगतो. माहेरवाशीण मुलीस घरभर फिरली नाचली. होते नव्हते ते सारे घेऊन गेली. हा सर्व तपशील फक्त द

- भिंत खचली . चूल विझली. होते नवते नेले .
  प्रसाद म्हणून पापान्यांमाद्ध्ये पाणी थोडे ठेवले .

- इतक्या कमी शब्दांत उद्ध्वस्त संसार डोळ्यांपुढे उभा राहतो. पण ह्या अस्मा
  बायकोला घेऊन तो लढतो आहे. पती पत्नीचे खंबीर नाते आपल्यापुढे क्षणाध
  दोघांची पुन्हा नव्याने उभे राहण्याची जिद्दही.

- कारभारणीला घेऊन संगे सर आता लढतो आहे
  पडकी भिंत बांधतो आहे, चिखलगाळ काढतो आहे.

- ही सारे ऐकून सरांचे आपल्या शिष्याविषयी प्रेम दाटून येणारच साहजिकच व
  करण्यासाठी खिशाकडे जातो ते पाहताच विद्यार्थी त्यांना अडवतो आणि म्ह
  आर्थिक नाही तर मानसिक मदत मागायला आलोय. सर जरा एकटेपणा जा
  धीराचे दोन शब्द ऐकायचे होते.

- स्वाभिमान तर तुम्ही आधीच शिकवला आहे सर . म्हणूनच माझा संसार ज
तरी माझ्या  पाठीचा कणा अजूनही ताठ आहे. माझ्या स्वाभिमानाचा कण
तुमची ती थाप पुन्हा हवी आहे . तुमचे  आशीर्वाद हवे आहेत. प्रेरणा हवी
म्हणजे पुढची लढाई मी सहज लढू शकेन.
- असा आशय असलेली ही कविता प्रत्येक वाचकाला प्रेरणादायी वाटते. सं
धैर्याने लढण्याचे बळ देते. काळ बदलेल पण जगण्याची ही मूल्यासंकाल्पन
विद्यार्थ्यांचे हे नाते अमर राहील. यातील स्वाभिमानाचा संदेश चिरंतन राही
या कवितेचे हे आशय सौंदर्य . तिच्यातील नादमयता आणि अतिशय साधी
जोडली राहील.

पुन्हा एकदा ही कविता आपण वाचून त्यातील आशय सौदर्याचा अनुभव घेऊ.